दैनिक
महाराष्ट्राच्या परिवर्तनवादी विचारांचे ऐकमेव निर्भिड दैनिक

# वादळ वार्ता

vadalvartanews@gmail.com ●संपादक : अजय भांगे ●उपसंपादक : गणेश गाडेकर https://epaper.vadalvarta.com

● बीड (महाराष्ट्र) दैनिक मराठी ● मंगळवार दि.१ जुलै २०२५ 9422660077 ● आरएनआय-एमएचएमएआर/२०२३/८७५५५ ● वर्ष २ रे ● अंक २१५ ● पाने ४ ● किंमत ४ रुपये

● Beed (Mahmar) Daily Marathi ● Tuesday 1 July 2025 9422660077 ● RNI-MAHMAR / 2023 / 87555 ● Year - 2nd ● Issue 215 ● Pages 4 ● Rate 4 Rs

# मराठी-महाराष्ट्राच्याबाबतीत तडजोड नाही : राज ठाकरे यांचा पुन्हा इशारा

## अधिवेशनात या विषयावर वेळ वाया घालवू नका-विरोधकांनाही सल्ला

मुंबई (वृत्तसंस्था)-मराठी भाषा आणि महाराष्ट्राच्या बाबतीत तडजोड होणार नाही, अशा शब्दात महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे प्रमुख राज ठाकरे यांनी सत्ताधारी पक्षांना सुनावले आहे. यानंतर सरकार अशा उद्योगात पडणार नाही, अशी अपेक्षा देखील त्यांनी व्यक्त केली. इतकेच नाही तर आता अधिवेशनात या विषयावर वेळ वाया घालवू नका, असा सल्ला देखील त्यांनी विरोधी पक्षातील आमदारांना दिला आहे. राज्यातील इतर प्रश्नांवर विरोधकांनी आवाज उठवा, अशी अपेक्षा देखील त्यांनी व्यक्त केली.हिंदीची सक्ती करणारा आदेश रद्द झाल्यानंतर राज ठाकरे यांच्या निवासस्थानी मनसे पदाधिकाऱ्यांनी जल्लोष केला. त्यानंतर राज ठाकरे यांनी प्रसार माध्यमांशी संवाद साधला. या वेळी राज ठाकरे म्हणले की, अधिवेशनात विरोधी पक्षाच्या आमदारांनी या विषयावर चर्चा करून वेळ वाया घालवू नये. महाराष्ट्रात अनेक प्रश्न तुंबलेले आहेत. त्यामुळे त्या प्रश्नावर बोलावे. शिक्षणामध्ये अनेक त्रुटी आहेत, शाळा नाही, शिक्षकांना पगार नाहीत, एकेका शिक्षकावर वर्क लोड टाकला जात आहे, इतरही कामे देखील शिक्षकांना दिले जात आहेत. इतके विषय आहेत, त्या विषयावर विरोधकांनी हात घालावा, असा सल्ला देखील ठाकरे यांनी दिला आहे.

### दोन्ही आदेश रद्द केले किंवा त्यांना रद्द करायला भाग पाडले

राज ठाकरे म्हणाले की, काल महाराष्ट्र सरकारने हिंदी सक्तीचे दोन्ही आदेश रद्द केले किंवा त्यांना रद्द करायला भाग पाडले. त्याबद्दल तमाम महाराष्ट्रातल्या मराठी जनतेचे मी अभिनंदन करतो. सर्व बाजूंनी रेटा आला आणि त्यातूनच सरकारला हे करावे लागले. वास्तविक काहीही गरज नसताना हा विषय समोर आला होता. महाराष्ट्रातील साहित्यिक, काही कलावंत त्याचबरोबर मराठी वर्तमानपत्राचे संपादक यांचे देखील आभार मानत असल्याचे राज ठाकरे यांनी म्हटले आहे.



### तर अभूतपूर्व मोर्चा असता, संयुक्त महाराष्ट्राचा काळ आठवला असता

वास्तविक हा विषय क्रेडिटचा नाही. मात्र, सरकारकडून आदेश निघाला, त्याचवेळी सर्वप्रथम आम्ही त्याला विरोध केला. त्या संदर्भात मी लिहिलेली तिन्ही पत्र मागील पत्रकार परिषद देखील वाचून दाखवली. राज्यातील राजकीय पक्ष देखील जसे उद्धव ठाकरे यांची शिवसेना, शरद पवार यांच्या राष्ट्रवादी काँग्रेस आणि इतरही राजकीय पक्ष आणि महाराष्ट्रातील संघटना यांनी देखील या मोर्चाला पाठिंबा दिला होता. पाच तारखेला आम्ही मोर्चा काढणार होतो. हा जर मोर्चा निघाला असता तर अभूतपूर्व असा असता. साधारणपणे ७० - ७५ वर्षातील लोकांना या मोर्चा मुळे संयुक्त महाराष्ट्राचा काळ आठवला असता. त्याच प्रकारचे वातावरण महाराष्ट्रामध्ये निर्माण झाले होते. मराठी ताकद काय आहे? मराठी भाषेच्या वाटेला गेले तर काय होते? हे देखील राज्यकर्त्यांना कळाले असेल. त्यामुळे परत ते असल्या भानगडीमध्ये जाणार नाही. अशी मी आशा-अपेक्षा बाळगतो, असे देखील राज ठाकरे यांनी म्हटले आहे.

## बीडमधील विद्यार्थिनीच्या लैंगिक छळा प्रकरणी आरोपींवर कडक कार्यवाही करा

### पशुसंवर्धन मंत्री ना.पंकजाताई मुंडेंच्या एसपींना सूचना

#### आणखी पालकांच्या तक्रारी असल्यास त्यांना शासनाची संपूर्ण सुरक्षा

**बीड । प्रतिनिधी**

शहरातील उमाकिरण शैक्षणिक संकुलात कोचिंग क्लास मध्ये शिकणाऱ्या विद्यार्थीनीचा लैंगिक छळ करणा-या आरोपींविरुद्ध कठोर आणि कडक कार्यवाही करा अशा सूचना पर्यावरण व पशुसंवर्धन मंत्री ना. पंकजाताई मुंडे यांनी एसपींना केल्या आहेत.

या घटनेविषयी ना. पंकजाताई मुंडे यांनी जिल्हयाचे पोलीस अधीक्षक नवनीत कावत यांच्याशी नुकतीच घटनेची माहिती घेवून याविषयी सूचना केल्या.उमाकिरण शैक्षणिक संकुलातील शिक्षक प्रशांत खटावकर आणि विजय पवार या दोघांनी एका सतरा वर्षीय



विद्यार्थिनीचे गेल्या एक वर्षापासून लैंगिक शोषण केले, याविरूध्द सदर विद्यार्थिनीने शिवाजीनगर पोलिसात गुन्हा दाखल केल्यानंतर ना. पंकजाताई मुंडे यांनी लगेच पोलिस अधीक्षकांना फोन करून आरोपींना तात्काळ अटक करण्याची सूचना केली होती. मुळातच ही घटना अतिशय संतापजनक आणि जिल्ह्याला काळीमा फासणारी आहे, शिक्षकांचे हे कृत्य गंभीर स्वरूपाचे आहे, त्यांना ताब्यात घेतले असले तरी ते सुटले जावू नयेत, यासाठी त्यांचेवर तात्काळ कडक कार्यवाही करा अशी सूचना ना. पंकजाताई मुंडेंनी केली. यासंदर्भात आणखी पालकांच्या तक्रारी असल्यास त्यांना शासनाची संपूर्ण सुरक्षा दिली जाईल, त्यांनी यासाठी पुढे यावे असे आवाहनही ना. पंकजाताईंनी केले आहे.

## बियाणे उगवले नाही अशा शेतकऱ्यांनी तात्काळ कृषी अधिकाऱ्याकडे तक्रारी कराव्यात-भाई अशोक रोडे

### शेतकरी कामगार पक्ष बी बियणे कंपनी विरोधात कोर्टात जाणार

**केज । प्रतिनिधी**

खरिपाची पेरणी पाऊस बरा झाल्याने शेतकरी लगबगिने केली मात्र महाबीज सह अनेक कंपन्याचे सोयाबीन शेतामध्ये उगवले नाही, अशा शेतकऱ्यांनी तात्काळ संबंधित कृषी कार्यालयशी संपर्क साधून आपल्या तक्रारी कराव्यात अशा आव्हान शेतकरी कामगार पक्षाचे मध्यवर्ती समिती सदस्य भाई अशोक रोडे यांनी केले आहे.

केज तालुक्यातील शे.गांजी येथील पंधरा-वीस शेतकरी काल शेतकरी कामगार पक्षाच्या कार्यालयात आले,त्यांनी बी उगवलं नसल्याची तक्रार कृषी कार्यालयाकडे दिली असल्याचे सांगितले,मात्र कृषी कार्यालयाचे अधिकारी आठ दिवस झाले त्यांच्याकडे कोणीही पंचनाम्याला गेले नाही अशी माहिती सदरील शेतकऱ्यांनी दिली यानंतर शेकापचे



नेते भाई मोहन गुंड यांनी वरिष्ठ कृषी अधिकारीशी बोलून तात्काळ पंचनामे करून घ्या असं विनंती केली आहे. बीड धाराशिव (उस्मानाबाद), लातुर विभागाला बियाणेच परीक्षण करणारा अधिकारी एकच आहे त्यामुळे विलंब होणार,पंचनाम्यासाठी परभणी विद्यापीठातून अधिकारी येणार नंतर त्याचे सॅम्पल घेऊन ते अहवाल देणार असल्यामुळे केज तालुक्यासह बीड जिल्ह्यातील शेतकऱ्यांनी आधी संबंधित कृषी कार्यालयाकडे द्याव्यात.दुकानदाराकडून घेतलेले बियाण्याची पावती जपून ठेवावी जेणे करून कंपनी आणि दुकानदाराकडून शेतकऱ्यांना नुकसान भरपाई मिळवून देण्यासाठी सोपं जाईल शेतकरी कामगार पक्ष शेतकऱ्यांच्या पाठीशी उभा आहे,मात्र शेतकऱ्यांनी तक्रारी देणे गरजेचे आहे.असे आव्हान शेकापचे भाई अशोक रोडे,भाई रचलिंग पाटील,भाई मंगेश देशमुख,अजिंक्य माने यांनी केले.

### आडसकर गटाला सरपंच रुद्रा कुरे यांचा जोरदार हाबाडा!

## मोहन दादा जगताप यांच्या उपस्थितीत राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी ( शरद पवार ) पक्षात केला प्रवेश




**माजलगाव । प्रतिनिधी**

पुनंदगावचे सरपंच रुद्रा कुरे हे रमेशराव आडसकर यांचे कट्टर समर्थक मानले जात होते. मात्र आडसकर यांचा झालेला विधानसभेतील पराभव पाहता त्यांचे समर्थक असलेले सरपंच रुद्रा कुरे यांनी त्यांची साथ सोडत आडसकरांना जोरदार हाबाडा देत महाविकास आघाडीतील घटक पक्ष असलेल्या राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी ( शरद पवार ) पक्षात दि.२८ जून रोजी मोहन दादा जगताप यांच्या उपस्थितीत पक्ष कार्यालयात प्रवेश केला. मोहन जगताप हे ब्राझील येथील कारखाना व ऊस उत्पादक अभ्यास दौरा करून आल्याबद्दल त्यांचा दि.२८ जून त्यांचा सत्कार सोहळा संपन्न झाला याच सोहळ्यात पुनंदगावचे सरपंच रुद्रा ( महारुद्र ) कुरे यांच्यासह ग्रामपंचायत सदस्य परमेश्वर मुळे , प्रल्हाद ( बाळू ) कुरे व दता कुरे सह अनेकांनी राष्ट्रवादी काँग्रेस (शरद पवार ) पक्षात प्रवेश केला. या प्रवेशाबद्दल राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे नेते मोहन दादा जगताप , सहाल भैय्या चाऊस, दयानंद भाऊ स्वामी यांनी त्यांचे स्वागत करून त्यांना पुढील राजकीय वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या या वेळी महाविकास आघाडीतील घटक पक्षातील अनेक मान्यवर उपस्थित होते.

## केज मधील खाजगी कोचिंग क्लासेसची होणार झाडाझडती

**केज । प्रतिनिधी**

महाराष्ट्राला काळिमा फासणारी घटना बीड जिल्ह्यात घडली एका खाजगी क्लासेसच्या शिक्षकानेच पवित्र नात्याला काळीमा फासली मात्र बीड जिल्ह्यात असंख्य अनधिकृत कोचिंग क्लासेस सुरु आहेत ना त्याची नोंद सरकारी दप्तरात आहे ना पुस्तकात.

या बाबत वृत असे कि केज शहरात गेल्या काही वर्षांपासून मोठ्या प्रमाणात खाजगी कोचिंग क्लासेस उभारले गेले असून त्यापैकी बरेचसे क्लासेस कोणत्याही अधिकृत परवानगीशिवाय बिनधास्त सुरू आहेत. या क्लासेसमध्ये काही ठिकाणी अगदी १६ वर्षांखालील विद्यार्थ्यांना सुद्धा प्रवेश दिला जात असल्याने नियमांचे सर्रास उल्लंघन होत असल्याचे निदर्शनास आले आहे. त्या अनुषंगाने केज तहसिलदार यांना दैनिक वादळ वार्ताचे संपादक अजय भांगे यानी निवेदन दिले असता तहसिल कार्यालयातून मंडळ अधिकारी तथा ग्रामीण मंडळ अधिकारी यांची समिती स्थापन करून सर्व




खाजगी कोचिंग क्लासेसची तपासणी करण्याचे आदेश दिले आहेत. याअंतर्गत तालुक्यातील प्रत्येक कोचिंग क्लासवर कारवाई करण्यात येणार असून त्यांच्याकडील परवानग्या, शिक्षकांचे पात्रता प्रमाणपत्र, इमारतीचे वापर परवाना, अग्निसुरक्षा यंत्रणा , जमा केलेल्या प्रत्येक विद्यार्थ्यांची फीस व त्यांच्या पावत्या अशा सर्व बाबींची तपासणी केली जाणार आहे. या कारवाईमुळे शिक्षण व्यवस्थेत पारदर्शकता येईल, आणि दर्जेदार शिक्षणास प्रोत्साहन मिळेल, असा विश्वास पालक व्यक्त करत आहेत. केज शहरातील खाजगी कोचिंग क्लासेस यांची तपासणी करण्यात येणार असुन आता 'दुध का दुध और पाणी का पाणी' होणार, यात शंका नाही.

कोणताही कोचिंग क्लासेस परवानगीशिवाय चालू आढळल्यास त्यावर त्वरित बंदी आणली जाईल आणि कायदेशीर कारवाई करण्यात येईल. यासोबतच पालकांनीही अधिकृत क्लासमध्येच मुलांना प्रवेश द्यावा, असे आवाहन प्रशासनाकडून करण्यात आले आहे.

**श्री.राकेश गिड्डे**
**तहसिलदार केज**

## संपादकीय..

# दिल दोस्ती दुनियादारी



दोस्तों के नाम का एक खत जेब में रख कर क्या चला, करीब से गुजरने वाले पूछते है, इस इत्र का नाम क्या है...!!

गुलजार यांच्या या हिंदी शेरामध्ये मैत्रीबद्दलची कमाल व्याख्या स्पष्ट होते. मैत्रीला उंचावर नेऊन ठेवण्याचं कसब कवींमध्ये असलं तरी, मैत्रीला स्वत:चं असं एक स्थान आहे, जे अव्वल दर्जाचं मानलं जातं. मैत्री कधीही आणि कोणाशीही होऊ शकते. ती ज्याची–त्याची वा साध्या प्रसंगी वा विशेष कारणामुळे होत असल्याने मैत्रीबद्दल शंकेचं कारणचं उरत नाही. जीवाला जीव देणाऱ्या मैत्रीची खासियत वेगळीचं असते. नात्यापलीकडील भावनेच्या अंतर्गत जीवाभावाच्या निश्चयाची खूणगाठ बांधणारे मित्र आसपास असल्याने विवेक बुद्धीने जो संवाद साधतो, ज्याच्याकडे जराही आकस नसतो, हेवा नसतो, लोभ–द्वेष नसतो, त्याचं मैत्रेय लवकर जुळतं. अशा मैत्रीला परिमाण नसलं तरी, विचार मात्र जुळावे लागतात.किंबहुना जाणारा तोल आपल्या कौशल्याने सांभाळणारा एक तरी मित्र तिथं असल्याने तो खऱ्या मैत्रीला न्याय देतो आणि उत्तम मित्रत्वाच्या पंगतीत जाऊन बसतो; म्हणूनचं खरेपणा शाबूत ठेऊन खोटेपणाची झळ बसू न देणारी मैत्री चिरकाल टिकते असं म्हणतात. सुस्थितीला मैत्रीचं माप वगैरे म्हणता येत नाही. कारण मैत्रीचं खरं मूल्यमापन आपत्ती काळातचं होतं. एका भावाची, मताची माणसं एकत्र आल्यावर हृदयात अपार सेवा भरली जाते आणि सर्वचं आपले मित्र होऊन जातात. तरीही कौशल्य गुणाच्या वापराने भासणं आणि असणं यातली तफावत ओळखता यायला पाहिजे. नाहीतर करून गेलो राव, ओळखता आला नाही मैत्रीचा डाव अशी दयनीय अवस्था व्हायची.एक अभ्यास म्हणून आपल्या जीवनात असंख्य माणसं जोडली जात असली तरी, मैत्रीचे बंध अभावानेचं जुळल्याची उदाहरणं दिसून येतात. हृदयाची भाषा हृदयाला कळू लागली की, स्नेह वाढू लागतो जो नात्यात लवचिकता भरतो. सुमधुर प्रशंसा, धीरगंभीर शब्द, प्रेमळ उत्तेजन, सहानुभूतीमय सांत्वन, चुकांसाठीची उपदेशवाणी ज्याच्याकडून लाभते किंवा मिळते तो सहज मित्रत्वाच्या वर्तुळात सामावला जातो.सुप्रसिद्ध कवी अनंत राऊत खऱ्या मैत्रीबद्दल आपल्या कवितेत म्हणतात, दु:ख अडवायला उंबऱ्यासारखा, मित्र वणव्यामध्ये गारव्यासारखा. अशा या मैत्रीबद्दलचा आशय जरी सोपा असला तरी त्याची घनता मोजता येत नाही. सख्ख्या आणि सच्च्या मित्रांशिवाय आयुष्य म्हणजे, सूर्याशिवाय आकाश. मग विचार करा या तेजस्वी सूर्याचं दर्शन दुर्लभ झालं तर, अंधकार माजेल. विचारांचा गोंधळ उडेल, व्यक्त करण्यातली अडचण घेऊन माणसं बिनमैत्रीची वावरू लागली तर तारतम्य सुटेल, ती वेडी होतील. तेव्हा आयुष्यात मित्र वा मैत्रीण हवीचं. ज्यांना यातलं कोणी नसतं ते एकटे पडतात. दुसरं म्हणजे मैत्री ही केवळ मनोरंजनासाठी नसून आपल्याकडील सुखदु:ख शेअर करण्याचा एकमेव सोपा मार्ग आहे. लखलखीत, स्वच्छ मार्गातल्या पारदर्शी नात्यात विद्या, शूरता, बळ, दक्षता, धीरोदत्त उदारमतवादी गुण आले की, मैत्रीला उणे पडत नाही. जसं की, ज्ञानोपासनेला सुधारणेची जोड मिळत ग्रंथ–पुस्तक आपल्यावर संस्कार करतात काहीसे तसेच; परंतु विशिष्ट हेतूकरिता केलेली मैत्री अखेरपर्यंत टिकत नाही. तोंडावर गोड बोलून मागून पलटवार करणारे मित्रमैत्रिणी घातकी असतात हेही खरंय. वैर करणाऱ्या, वैर धरणाऱ्या मित्रावर जास्त विश्वासार्हता बाळगूच नये.मित्र–मैत्रिणींच्या दुनियेतलं मोठं वरदान विवेकी मित्र मिळण्यात आहे असं मला नेहमी वाटतं. तुम्ही स्वतः चांगले मित्र किंवा मैत्रीण बनण्याच्या प्रयत्नात असाल तर समोरून मित्रत्वाची चांगलीच साद येईल. उत्तम मित्रांच्या संगतीत आपली प्रगती होते हे खरं असलं तरी, शत्रू आणि मित्र आपल्या कृतीमुळेच निर्माण होतात.कधी शत्रू मित्र होतो तर कधी मित्र शत्रू म्हणून वावरतो. थोडक्यात दिलोंकी यारी म्हणजे चहासोबत खारी आणि तुझ्या दोस्ती पुढे मित्रा फिकी पडते दुनियादारी. चांगली आणि सुदृढ मैत्री रत्नजडीत मुकुटासारखी असते. तुमचा मित्र परिवार कितीही मोठा असला तरी, प्रत्येकाची तुमच्याशी असलेली बांधिलकी तुम्ही कसे वागता यावर अवलंबून असल्याने, थोडक्यात सांगायचं तर निष्ठावान मित्र आपल्या आयुष्यात टॉनिकसारखे असतात; हा माझा अनुभव आहे. मित्र असावा तर तो हक्काचा, संकटात मदतीचा, काळीज तुकड्याचा, घोर विश्वासाचा, दु:खात भरवशाचा, नैराश्येत आशेचा, अंधारात तेजाचा.मंडळी वर्षातून साजरा होणारा मैत्री दिन एका दिवसाची गोष्ट ठरत नाही. मूठभर विश्वास चांगल्या मैत्रीची पाळमुळं रुजवत मैत्रीचा पाया भक्कम करतो. दुनियादारीशी इमान राखत, अशा या मैत्रीला कुणाची दृष्ट न लागो...

# मान्सूनपूर्व पावसामुळे शेतीची कामे खोळंबली



मागील आठ ते दहा वर्षांमध्ये आपल्या राज्यात जून महिना संपत आला तरी पुरेसा पाऊस पडला नव्हता. त्यामुळे बऱ्याच वेळा शेतकरी राजाला दुबारा पेरणी करावी लागली होती. यात अनेक शेतकऱ्यांना नुकसान सहन करावे लागले होते. यावेळी अगदी मे महिन्याच्या प्रारंभापासून पावसाने सुरुवात केली आहे. त्यामुळे शेतकरी राजा चिंतेत दिसत आहे. शेतीची कामे सोडा. हातातोंडाला आलेल्या पिकाला सुद्धा शेतकऱ्यांना वंचित व्हावे लागणार आहे. तसेच कोपऱ्यात साठलेल्या पाण्यामुळे पिकलेली पिके कुजणार आहेत. याचा परिणाम शेतकरी दादांच्या उत्पादनात घट होणार हे मात्र नक्की. मग संसार चालणार कसा...! तेव्हा मान्सूनपूर्व पावसामुळे शेतीची कामे खोळंबली असली तरी शेतात पाणी साचल्यामुळे उन्हाळ्यात पिकलेल्या पिकांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले आहे.

मागील आठवड्यात कोकण रेल्वेने मुंबईला येताना बऱ्याच ठिकाणी पिकलेले भात वाफ्यात पाणी साचल्यामुळे पाण्यात तरंगताना दिसत होते. काही वाफ्यात भात कापून पसरून ठेवले होते. तेव्हा अशा भाताला कोंब येणार. म्हणजे शेतकरी दादांची उन्हाळी मेहनत पूर्ण पाण्यात जाणार आहे. अशा शेतकऱ्यांना ताबडतोब नुकसानभरपाई मिळायला हवी. त्यासाठी ज्या शेतकऱ्यांचे पावसामुळे नैसर्गिक नुकसान झाले असेल त्यांचे पंचनामे करून योग्यती कारवाई शासन पातळीवर होणे गरजेचे आहे. म्हणजे नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना त्वरित नुकसान भरपाई मिळाल्यामुळे पुढील शेतीची कामे करणे सोयीचे होईल. यासाठी शेतकऱ्यांकडे फार्मर आयडी अर्थात शेतकरी ओळख क्रमांक शासनमान्य असायला हवा. तरच त्यांना शासकीय विविध योजना व अनुदानाचा लाभ घेता येणार आहे. जर शेतकऱ्यांनी फार्मर आयडी बनवले नसेल तर आपल्या जिल्ह्यातील नागरी सुविधा केंद्रावर तयार करून घ्यावे.

सध्याच्या बदलत्या हवामानाचा विचार करता शेतकऱ्यांचे सर्वात जास्त नुकसान होत आहे. ही परिस्थिती शेतीप्रधान देशाला पोषक नाही. उन्हाळ्यामधील मे महिना म्हणजे शेतकऱ्यांच्या शेतीच्या मशागतीचा काळ. जमिनीची मशागत करण्यापूर्वी शेत जमिनीत पाणीच पाणी. मग मशागतच झाली नाही, मग सांगा पेरणी कशी करणार. त्याचप्रमाणे राज्यातील शेतकऱ्यांसाठी कृषी विभागाच्या वतीने शेतकरी चिंतेत असू नये म्हणून विविध माध्यमांच्या माध्यमातून बातम्या प्रसारित करण्यात येत आहेत.

कोकण विभागातील सिंधुदुर्ग जिल्ह्याचा विचार करता सिंधुदुर्ग जिल्ह्यातील कृषी विभागाच्या वतीने सन २०२५–२६ या खरीप हंगामासाठी जिल्हा व जिल्ह्यातील प्रत्येक तालुक्यामध्ये कृषी निविष्ठा उपलब्धता व तक्रार निवारण कक्ष व भरारी पथक स्थापन करण्यात आले आहे. कृषी निविष्ठाची गुणवत्ता, शेतकऱ्यांच्या तक्रारीचे निराकरण व योग्य मार्गदर्शन करण्यात येणार आहे. असे जर राज्यातील प्रत्येक जिल्ह्यात झाले तर शेतकरी राजाला अधिक बळ येईल.

महत्त्वाची बाब म्हणजे, शेतकऱ्यांनी पेरण्या करण्याची घाई करू नये. पुढील दोन आठवड्याने हवामान कोरडे होण्याची शक्यता आहे असे आवाहन राज्यातील कृषी विभागाने शेतकरी बांधवांना केले आहे. यात कोरडवाहू शेती करणाऱ्या शेतकऱ्यांना जास्त धोका आहे. जर पेरणी केली तर राज्यातील हवामान विभागाच्या अंदाजाप्रमाणे ५ जून नंतर मान्सून थांबल्यास दुबारा पेरणी करण्याची नामुष्की शेतकऱ्यांवर येईल. यात शेतकऱ्यांचे मोठे नुकसान होणार आहे असे वाटत असले तरी कोरडवाहू जमीन सोडून नदी नदीकाठच्या ज्या शेतजमिनी आहेत तेथे भाताची पेरणी करायला काहीच हरकत नाही त्यासाठी प्रथम लागवड करून नंतर पेरणी करावी. त्यासाठी कृषी तज्ज्ञांचे मार्गदर्शन घेतल्यास अधिक उत्तम होईल.

कोकणातील शेतकऱ्यांच्या मते, एकदा जमीन थंड झाली की, पेरणी करून सुद्धा भात रुजून येत नाही. पाऊस पडल्या पडल्यास पेरणी केल्यास पेरलेले भात रुजून येते. मात्र नंतर पावसाने पाठ फिरवता कामा नये. यासाठी मशागत महत्त्वाची असते असे सांगायला विसरत नाहीत. हा आहे अनुभव. बऱ्याच वेळा शेतीसाठी अनुभव उपयोगाचा असतो. तेव्हा मे महिन्याचा विचार करता पावसाचे लवकर आगमन झाल्याने शेतीच्या दृष्टिकोनातून कृषी विभागाचा सल्ला घेणे शेतकऱ्यांना जास्त हिताचे ठरणार आहे. जर नैसर्गिक आपत्ती आल्यास शासनच आर्थिक मदत करणार आहे. कायद्याचा विचार करता शासकीय स्तरावरील मार्गदर्शन लाभदायक ठरेल. तेव्हा केव्हाही पुस्तकी ज्ञान अधिक मार्गदर्शक ठरते. असे असले तरी आता जरी कृषी विभागाने राज्यातील शेतकऱ्यांना सबुरीचा सल्ला दिला तरी अंदाजे मान्सूनचे आगमन या वर्षी लवकर होण्याची शक्यता आहे असे जरी वर्तविले असते तर शेतकऱ्यांनी आपली लागवडीची कामे लवकर करून घेतली असती. तेव्हा राज्यातील कृषी तसेच हवामान विभागाने सतर्क राहाणे योग्य आहे. कारण शेती हाच भारतीय अर्थव्यवस्थेचा कणा आहे हे विसरून चालणार नाही.

तेव्हा या वर्षी शेतकऱ्यांच्या ध्यानीमनी नसताना सुद्धा लवकर पावसाने हजेरी लावली मात्र कालपासून थोडी विश्रांती घेतल्यासारखी वाटत आहे. याचा परिणाम राज्यात अनेक ठिकाणी नागरिकांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले आहे. काही ठिकाणी गावांचा सुद्धा संपर्क तुटला आहे. आता मान्सूनपूर्व पावसामुळे शेतीची कामे खोळंबल्यामुळे शेतकरी राजाची चिंता वाढली आहे. यासाठी शासनाने नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना आर्थिक मदत जरी जाहीर केली तरी झालेले नुकसान भरून येणार नाही. तेव्हा राज्यातील शेतकऱ्यांच्या भविष्याचा विचार करता कृषी व हवामान विभागाने वेळच्या वेळी शेतकऱ्यांना सूचना तसेच सल्ला देणे राज्याच्या हिताचे ठरेल. म्हणजे राज्यातील शेतकऱ्यांनी आपली कामे वेळच्या वेळी केल्यास शेतीची कामे खोळंबणार नाहीत.

# पारदर्शक कारभार कुठे आहे?

राज्यात, महापालिकेत किंवा स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये सत्ता कुणाचीही असली तरी विकासाची आणि दुरुस्ती–देखभालीची कामे ठेकेदारांना देणारी यंत्रणा तीच असते. सरकार बदलले किंवा महापालिकेतील सत्ताधारी बदलले तरी संवेदनशील खात्यातील अधिकारी, कर्मचारी, अगदी कारकून–शिपायापर्यंत स्टाफ वर्षानुवर्षे त्याच जागी असतो. कोणते काम कुणाला द्यायचे याची मोठी साखळी असते. राजकारणी, अधिकारी, ठेकेदार यांचे हितसंबंध ही साखळी जपत असते. दरवर्षी पावसाळ्यात मुंबई महानगराची वाताहत होते. मुंबईची तुंबई होते. यामागे महत्त्वाचे कारण म्हणजे कामात होणारा भ्रष्टाचार आणि टक्केवारी आहे. जोपर्यंत देवघेव संस्कृती संपुष्टात येणार नाही तोपर्यंत नालेसफाई किंवा कचरा सफाईवर हजारो कोटी खर्च केले तरी मुंबईची तुंबईपासून सुटका होणार नाही.

दि. २६ मे रोजी पहाटेपासून जोरदार पावसाने मुंबई महानगर प्रदेशावर आकांडतांडव केल्यानंतर देशाची आर्थिक राजधानी जवळपास ठप्प झाली. दोन कोटी लोकसंख्येच्या महामुंबईचे जीवन विस्कळीत झाले. सखल भाग, रस्ते आणि रेल्वे मार्ग पाण्याखाली गेल्याने उपनगरी रेल्वे, बेस्ट बसेस, मेट्रो रेल्वेने माना टाकल्या. जोरदार पावसाने मुंबई बंद होणे किंवा विस्कळीत होणे हे काही मुंबईकरांना नवीन नाही. दरवर्षी पावसाळ्यात साधारणपणे जुलै महिन्यात पावसाने मुंबईत हाहाकार होतो. दरवर्षी पावसाळ्यात मुंबईकरांना गुडघाभर पाण्यातून चालावे लागते. दरवर्षी पाणी साचण्याची ठिकाणे वाढत आहेत. दरवर्षी नालेसफाईची बोंब आहे. दरवर्षी रस्त्यावरील कचरापेट्या साफ=होत नाहीत हाच अनुभव आहे. दरवर्षी पदपथ व रस्त्यावरील अतिक्रमणे वाढतच आहेत.

मुंबईला नागरी सेवा देण्याची जबाबदारी मुंबई महापालिकेवर आहे. देशातील सर्वांत श्रीमंत महापालिका असा तिचा लौकिक आहे. यावर्षी मुंबई महापालिकेचे बजेट ७२ हजार कोटी आहे. म्हणूनच मुंबई महापालिकेवर आपली सत्ता असावी. महापालिकेवर आपले वर्चस्व असावे असे प्रत्येक राजकीय पक्षाला वाटते. मुंबईची सेवा करण्यासाठी किती जण निवडणुका लढवतात हा एक अभ्यासाचा विषय आहे. पण निवडून आल्यानंतर नगरसेवकांची कशी भरभराट होते हे मतदारांना बघायला मिळते. मुंबईत आमदारांपेक्षा नगरसेवकाला जास्त महत्त्व असते. कारण महापालिकेच्या स्थानिक कामांमध्ये त्याच्या शिफारसीला महत्त्व असते. नगरसेवक कसे झटपट गडगंज होतात, हे जनतेला समजते. महापालिकेबरोबरच नगरविकास, महसूल ही खाती मध्यस्थांनी नेहमीच वेढलेली असतात. मुंबई महापालिका, म्हाडा, एसआरए, एमएमआरडीए (मुंबई महानगर विकास प्राधिकरण), सिडको, मेट्रो, सार्वजनिक बांधकाम अशा डझनभर यंत्रणांना मुंबईत मोठे महत्त्व आहे. त्यावर नेमणुका, बदल्या व बढत्यांसाठी काय काय करावे लागते याचे भरपूर किस्से ऐकायला मिळतात. या सर्व यंत्रणांवर राज्याच्या प्रशासकीय मुख्यालयातून म्हणजेच मंत्रालयातून थेट नियंत्रण असते. गेली तीन वर्षे मुंबई महापालिकेची निवडणूकच झालेली नाही. राज्यातील सर्व महापालिका, स्थानिक स्वराज्य संस्थांवर प्रशासक किंवा आयुक्तांमार्फत कारभार चालू आहे. अनेक महापालिका, पालिका व स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका चार ते पाच वर्षे झाल्या नसल्याने राजकीय पक्षांचे कार्यकर्ते अस्वस्थ आहेत. राज्यकर्ते मात्र खूश आहेत. थेट मंत्रालयातूनच सर्व महापालिका व स्थानिक स्वराज्य संस्थांचा कारभार चालू असल्याने त्यात नगरसेवकांचा कुठेही वाटा नसतो.

दि. २६ मे रोजी मुसळधार पावसाने मुंबईची तुंबई झाली, तेव्हा देशाची राजधानी असलेल्या महानगराची दरवर्षी तुंबई होण्यास जबाबदार कोण? या प्रश्नावर माध्यमातून चर्चा झाली. तेव्हा भ्रष्टाचार हेच उत्तर अनेकांकडून ऐकायला मिळाले. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी मुंबईतील एका बड्या माध्यम समूहाला दिलेल्या सविस्तर मुलाखतीत राजकारणाचे अवमूल्यन झाल्याचे मान्य केले आहे. तसेच मुंबई महापालिका कारभारात होणाऱ्या भ्रष्टाचाराबाबत चिंताही व्यक्त केली आहे. प्रशासनातील भ्रष्टाचार आपण खपवून घेणार नाही, असा सज्जड दमही दिला आहे. गेली तीन वर्षे मुंबई महापालिकेवर प्रशासकीय कारभार आहे. महापालिकेवर थेट नियंत्रण मंत्रालयातूनच आहे. मुंबई महापालिकेवर ठाकरे यांच्या शिवसेनेची पंचवीस वर्षे सत्ता होती, तेव्हापासून चालू असलेला भ्रष्टाचार आजही चालूच आहे. भ्रष्टाचार, टक्केवारी आणि घोटाळे हा मुंबई महापालिकेला लागलेला शाप आहे. मुंबई महापालिका शापमुक्त कधी होणार हा कळीचा मुद्दा आहे. गेल्या काही वर्षांत मुंबईत एकाच वेळी मेट्रो, रस्ते, उड्डाणपूल, पादचारी मार्ग, काँक्रिटीकरण, रस्ते दुभाजक अशी विविध कामे चालू आहेत. संपूर्ण मुंबई ठिकठिकाणी खोदलेली आहे. कामाच्या ठिकाणी पत्रे लावले असल्याने रस्ते अरुंद झाले आहेत. शिवाय बारा ते पंधरा हजार इमारतींची कामे चालूच आहेत. वाहतुकीची कोंडी नाही असा रस्ता मुंबईत शोधून दाखवा अशी स्पर्धा लावण्याची वेळ आली आहे. मुंबईतील प्रत्येक रस्त्यावर खड्डे आहेत किंवा त्याला भेगा पडलेल्या आहेत. देशाची राजधानी नवी दिल्लीत जर सुंदर, गुळगुळीत, प्रशस्त, रुंद रस्ते आहेत, अतिक्रमणमुक्त पदपथ आहेत मग देशाच्या आर्थिक राजधानीत व राज्याच्या राजधानीत चांगले रस्ते व मोकळे पदपथ का मिळू नयेत? रस्त्यांची कामे व पदपथ या कामात सर्वाधिक भ्रष्टाचार होतो हे काही गुपीत नाही. पण तो कोणीही थांबवू शकले नाही. गेली तीन वर्षे नगरसेवक नाहीत. आमदार हाच मतदारसंघात प्रमुख लोकप्रतिनिधी आहे. त्याच्या वॉर्डात तोच सर्वस्व असतो. त्याच्या शिफारसींनुसार महापालिकेतील व पोलीस स्टेशनवरील नेमणुका होत असतात. त्याला सहसा सरकार दुखावत नाही. पण दुय्यम दर्जाच्या कामाबाबत आमदाराला कोणी जबाबदार धरत नाही.

उत्तर प्रदेशातील गंगा नदी शुद्धीकरणावर हजारो कोटी खर्च झाले, गंगा नदी झाली का शुद्ध? पुण्याच्या मुठा नदीच्या प्रकल्पावर केंद्राने आठशे ऐंशी कोटी मंजूर केले, ते पैसे कशावर खर्च झाले? मुंबईच्या मिठी नदीतील गाळ काढण्यावर ४०० कोटी खर्च झाले, मिठी नदी स्वच्छ तर झाली नाहीच पण बनावट बिले सादर करून ठेकेदारांनी पैसे उकळले. आता म्हणे ६५ कोटींचा घोटाळा झाला असे सांगण्यात येत आहे. महापालिकेच्या अधिकारी व कर्मचाऱ्यांच्या संगनमताशिवाय असा घोटाळा होऊ शकतो का? महापालिका व खासगी कंपन्यांचे मिळून तेरा जणांना अटक झाली आहे.

गेल्या काही वर्षांत आपल्या कार्यकर्त्यांना खूश करण्यासाठी त्यांना कामांची कंत्राटे देण्याची प्रथा सुरू झाली आहे. कोरोना काळातही इस्पितळांमध्ये जेवणखाणाची हजारो कोटींची कंत्राटे तेव्हा सत्ताधारी पक्षाच्या कार्यकर्त्यांना दिली होती, त्यांनी सब कॉन्ट्रॅक्ट देऊन कमिशनपोटी भरपूर पैसे कमावले. त्याची लाचलुचपत प्रतिबंधक खात्याकडून चौकशीही झाली व आरोपपत्र दाखल झाले. आपण मतदारसंघात लोकांसमोर सतत राहिले पाहिजे म्हणून कार्यकर्त्यांना पैसे देऊन कार्यक्रमाचे आयोजन करण्यास सांगितले जाते. होर्डिंग, पोस्टर लावून नेत्यांच्या छब्या झळकवल्या जातात. हे सर्व पैसे कोठून येतात? विकास प्रकल्पांवर व नागरी सुविधांच्या कामावर कोटी कोटी खर्च दाखवले जातात, ते खरोखरच त्या कामांवर पूर्णपणे वापरले जातात का? गेल्या दहा वर्षांत टक्केवारी सातत्याने उंचावत गेली याची उघड चर्चा होते. देणारे व घेणारे दोघांनाही त्याचे काहीच वाटत नाही. पण कामासाठी जी तरतूद केलेली असते तेवढी प्रत्यक्षात खर्च होत नाही. त्यामुळे कामाचा दर्जा राहात नाही. दर्जा तपासला जात नाही. कंत्राटदार, दलाल, मध्यस्थ, राजकारणी, अधिकारी–कर्मचारी असे हितसंबंध गुंतल्यावर दुसरे काय होणार? बनावट बिले व बनावट प्रमाणपत्रे संगनमताने सादर होत असतील तर मुंबईची वाताहतच होणार...

ज्या दिवशी मुंबईतील पदपथ अतिक्रमणमुक्त होतील, उपनगरी रेल्वे स्टेशनच्या बाहेर आणि उपनगरातील प्रमुख रस्ते फेरीवाल्यांच्या विळख्यातून मुक्त होतील, रस्त्यावर वडापाव, भाजीपाव, अंडाबुर्जीपासून चाईनीज विकणारे हटवले जातील, उपनगरी रेल्वेतील विनातिकीट प्रवाशांना संपूर्ण चाप लावला जाईल, रात्रीचे पुन्हा सुरू झालेले डान्स बार बंद होतील, त्या दिवशी भ्रष्टाचार आटोक्यात आला असे समजता येईल. वॉर्डात अतिक्रमण आणि बेकायदेशीर बांधकाम झाले तर तेथील वॉर्ड ऑफिसर व सीनिअर पोलीस इन्स्पेक्टर यांना जबाबदार धरले जाईल असे तत्कालीन मुख्यमंत्री विलासराव देशमुख यांनी जाहीर केले होते, नंतर हीच तंबी अनेकांनी दिली पण ज्या वॉर्डात जास्त फेरीवाले व जास्त अतिक्रमणे त्या ठिकाणी वॉर्ड ऑफिस व पोलीस स्टेशनला पोस्टिंग मिळावे म्हणून स्पर्धा असते. मग भ्रष्टाचारमुक्त व पारदर्शी कारभाराची अपेक्षा कशी करणार? मुंबईला तीन पालकमंत्री आहेत आणि मुंबई महापालिकेवर आयएएस दर्जाचे पाच आयुक्त आहेत. मुंबई महापालिकेच्या कारभारावर श्वेतपत्रिका काढावी अशी मागणी आशीष शेलार यांनीच केली आहे. ते मुंबई भाजपाचे अध्यक्ष आहेत आणि मुंबईचे एक पालकमंत्री आहेत. श्वेतपत्रिका काढून जनतेसमोर एकदा वास्तव पुढे यावे हीच अपेक्षा.

## राहुरी,अहिल्यानगर पोलीसांनी केले महाराष्ट्रातील बनावट नोटांचे मोठे रॅकेट उघड!

# सोलापूर येथील तीन आरोपी ताब्यात घेऊन त्यांच्याकडून बनावट नोटा तसेच बनावट नोटा बनवण्याचे मशीन व इतर साहित्य असा लाखोंचा मुद्देमाल केला हस्तगत

**सोलापूर । प्रतिनिधी**

मा.पोलीस अधीक्षक सोमनाथ घार्गे सो यांच्या पोलीस स्टेशन हद्दीत पाई पेट्रोलिंग व इत्तर सूचनाच्या अनुषंगाने दिनांक २८/०६/२०२५ रोजी रात्री २१.३० वा सुमारास, मा. पोलीस निरीक्षक संजय ठेंगे व पोलीस पथक राहुरी शहरात पेट्रोलिंग करत असताना, पोलीस निरीक्षक संजय ठेंगे यांना गोपनीय माहिती मिळाली की तिन अज्ञात इसम हे काळ्या रंगाची होंडा शाईन नंबर MH45Y4833 ही मोटरसायकल घेऊन अहिल्यानगर कडून राहुरी कडे भारतीय चलनाच्या नकली नोटा करणात बाळगून येत आहेत. लगेच त्यांनी पोलीस पथकाला सूचना करून राहुरी शहरात नगर मनमाड रोडवरील संत गाडगेबाबा विद्यालयासमोर सापळा लावून, तोन संशयित इसम १) पप्पू उर्फ प्रतीक भारत पवार वय ३३ वर्ष राहणार सोलापूर २) राजेंद्र कोंडीबा चौघुले वय ४२ रा. कर्जत जिल्हा अहिल्यानगर ३) तात्या विश्वनाथ हजारे वय ४१० रा. पाटेगाव तालुका कर्जत यांना ताब्यात घेऊन, दोन शासकीय पंचांसमक्ष त्यांची अंगझडती पंतली असता त्यांचे अंगझडतीत मोबाईल व भारतीय चलनाच्या हुबेहूब दिसणाऱ्या नोटा मिळून आल्या. पोलीस निरीक्षक यांनी लगेच ॲक्सिस बँक मॅनेजर कैलास वानी यांना बोलावून सदर नोटा तपासल्या असत्या त्या बनावट असल्याचे निष्पन्न झाले.



सदर आरोपींना ताब्यात घेऊन त्यांच्याकडे कसून चौकशी केलो असता त्यांनी आम्ही बनावट नोटा तयार करतो ते ठिकाण दाखवत असे सांगितल्याने माननीय पोलीस निरीक्षक यांनी सदर ठिकाणी पोलीस पथक रवाना करून शितल नगर टेंभुर्णी येथे समाधान गुरव यांचे इमारतीत आरोपीने भाड्याने घर भाड्याने घेतलेले असून तेथे १)शी करण्याची मशीन व प्रिंटर २) कटिंग करण्याची मशीन ३) नोटा बनवण्यासाठी या कागद ४) नोटा मोजण्याचे मशीन ५) लॅमिनेशन मशीन ६) कंट्रोलर युनिट सर्व मशिनरीची किंमत सुमारे पाच लाख रुपये)७) पाचशे रुपये चलनाच्या बनावट नोटांचे एकूण ७५ बंडल ज्याची किंमत ३७,५०,००० रुपये ८) दोनशे रुपये चलनाच्या बनावट नोटा चे एकूण ४४ चंडल ज्याची किंमत ८.८०,०० रुपये ९) पाचशे रुपयांच्या नोटा प्रिंट मारलेले परंतु कट न केलेले कागदाचे बंडल्स (१८,००,००० रुपये किमतीचे) अशा सर्व ७०,७३,९२० रुपये किमतीचा मुद्देमाल जप्त केला आहे.सदर आरोपो विरुद्ध राहुरी पोलीस स्टेशन येथे गुरनं ७२४/ २०२५ भारतीय न्याच संहिता कलम- १७९,१८०, ३ (५) प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला असून सदर आरोपी हे सराईत गुन्हेगार आहेत. सदर आरोपीविरुद्ध कुडूवाडी पोलीस स्टेशन जिल्हा सोलापूर येथे गुरनं नंबर ५०३/२०२२ प्रमाणे गुन्हा दाखल असून सदर गुन्ह्यात आरोपी हे २२ महिने तुरुंगात होते.सदरची कारवाई मा. श्री. सोमनाथ घार्ग सो. पोलीस अधीक्षक अहिल्यानगर, मा. श्री. वैभव कलुबर्ग सो. अपर पोलीस अधीक्षक श्रीरामपुर जि, अहिल्यानगर, श्री. डॉ. बसवराज शिवपुजे सो उपविभागीय पोलीस अधिकारी श्रीरामपुर उपविभाग जि. अहिल्यानगर यांच्या सुचना व मार्गदर्शनाखाली पो. नि. संजय आर.ठेंगे यांचे नेतृत्वाखाली पोउपनि. संदिप मुरकुटे, पोहेकों/सुरज गायकवाड, राहुल यादव, विजय नवले, संदिप ठाणगे, पोकॉ. सतीश कुन्हाडे, अंकुश भोसले, प्रमोद ढाकणे, गणेश लिपणे, नदिम शेख पथकाने केली असून सदर पथकास सपोनि, सुदाम शिरसाट, पोउपनि राजु जाधव, पोहेकॉ. साळवे, शिंदे, पोकॉ. पाखरे नेमणूक राहुरी पोलीस स्टेशन जि. अहमदनर यांनी केलेली आहे. सदर गुन्ह्याचा पुढील तपास पोउपनि संदिप मुरकुटे ह करत आहेत.

## गांधी तिर्थ स्वच्छ शाळा राज्यस्तरीय प्रतियोगिता मध्ये

# साने गुरुजी निवासी विद्यालय केज ला ५१ हजाराचे रोख पारितोषिक

**केज । प्रतिनिधी**

गांधी तिर्थ स्वच्छ शाळा राज्यस्तरीय प्रतियोगिता मध्ये येथील बीड जिल्हा ऊसतोड कामगार विकास मंडळ केज संचलित साने गुरुजी निवासी विद्यालय, केज या शाळेला महाराष्ट्रातील तालुका स्तरातुन तालुकास्तरीय प्रथम क्रमांक,सन्मान चिन्ह, प्रशस्तीपत्र रोख रक्कम ५१ हजार रुपयांचे रोख पारितोषिक देण्यात आला.हा पुरस्कार सोहळा जळगाव येथील जैन हिल्स वरिल गांधी तिर्थच्या कस्तुरबा सभागृहात रविवार दिनांक २९ जून २०२५ रोजी सकाळी साडे नऊ वाजता संपन्न झाला. या पुरस्कार सोहळ्यास पुणे येथील सागर मित्र अभियानचे सह संस्थापक श्री.विनोद बोधनकर, जळगाव जिल्हा परिषदचे मुख्यकार्यकारी अधिकारी मीनल करनवाल, महाराष्ट्र शासनाच्या शिक्षण विभागाचे राज्यसल्लागार परिषदेचे सदस्य अनिल बोरनाले, गांधी रिसर्च फाउंडेशनचे विश्वस्त तथा जैन इरिगेशन सिस्टीम लिमिटेडचे अध्यक्ष श्री. अशोक जैन यांच्या प्रमुख उपस्थितीत हा कार्यक्रम पार पडला. कार्यक्रमालचे प्रस्ताविक श्री.गिरिष कुलकर्णी यांनी केले तर आभार प्रदर्शन चंद्रकांत पाटील यांनी केले या कार्यक्रमासाठी राज्यातुन विविध शैक्षणिक संस्थेचे संस्था चालक, मुख्याध्यापक,समन्वयक, शिक्षक,विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते प्रातिनिधिक स्वरूपात मुख्याध्यापक,समन्वयक यांनी आपले मनोगत व्यक्त केले.तसेच वर्षभरात शाळेत राबविण्यात आलेले स्वच्छता विषयाचे उपक्रमाचे व्हिडिओ सादर करण्यात आले.



प्लास्टिक कच-याचे दुष्परिणाम या विषयावर सविस्तर मार्गदर्शन श्री. विनोद बोधनकर यांनी केले मानव व सजिव जात वाचवण्यासाठी जनजागृती विद्यार्थ्यांमध्ये निर्माण केली पाहिजे.वैज्ञानिक दृष्टीकोन, आध्यात्मिक मुल्य,लोकसहभाग आणि जागतिक नागरिकत्व या संकल्पनेतून ज्ञान, विज्ञान आणि कर्मयोग शिकवले पाहिजे, जमिनीवर ३०% जंगले असुन त्यावर कुर्हाड घालविण्याचे काम केले जात आहे.जमिनी पेक्षा खा-या पाण्यातील जंगले ७०% आक्सिजन देतात. प्लास्टिकच्या आती वापरामुळे ओढे,नाले, नदी मार्फत समुद्रापर्यंत पोहचवुन सर्वात मोठ्या प्रमाणात कुर्हाड आपण प्रत्येक जण चालवत आहोंत.मुलामध्ये प्लास्टिक विषयी जागरूकता निर्माण करुन प्लास्टिकचे येणारे संकट विद्यार्थ्यांनी दुर करावे या विषयी विनोद बोधनकर यांनी सविस्तर मार्गदर्शन केले. कार्यक्रमाचे अध्यक्षयी समारोप करताना श्री. अशोक जैन यांनी सार्थक करु या जन्मांचे रुप पालटु वसुंधरेचे या प्रमाणे आपण जन्माला आलो त्यापेक्षा परिसर अधिक सुंदर करून सोडले पाहिजे याच संस्कारातुन प्रत्येक सहकारी जैन हिल्स येथे कार्य करतो त्याच्यातुनच गांधी तिर्थ स्वच्छ शाळा राज्यस्तरीय प्रतियोगिता समोर आली.भविष्य काळात यांचे स्वरुप मोठे करणार असल्याचे त्यांनी सांगितले.या सोहळ्यास संस्थेचे अध्यक्ष अँड.श्री. उद्धवराव कराड, प्रा.डॉ. कविताताई कराड मॅडम, कु.साक्षी कराड,पवार ज्ञानेश्वर, चाटे लहु, दस्तुरे कपिल,सोनवणे आदी उपस्थित होते.

# सोन्या तू अजून शुद्धीवर आला नाही का? ;राऊत यांना गुलाबराव पाटलांचे प्रत्युत्तर

**मुंबई (वृत्तसंस्था)**-मराठी ही आमची भाषा आहे आणि आम्ही ते मान्य करतो. मात्र, विषय केवळ हिंदीचा आहे. हिंदीच्या बाबतीत सामूहिक निर्णय झाला पाहिजे, अशीच सर्वांची इच्छा आहे. असे परखड मत एकनाथ शिंदे यांच्या शिवसेनेचे मंत्री गुलाबराव पाटील यांनी व्यक्त केले आहे. इतकेच नाही तर त्यांनी संजय राऊत यांच्यावर देखील जोरदार हल्ला चढवला. 'सोन्या तू अजून शुद्धीवर आला नाही का?' असा प्रतिप्रश्न गुलाबराव पाटील यांनी संजय राऊत यांना विचारला आहे.



राज्यात हिंदीच्या मुद्द्यावरून राज ठाकरे आणि उद्धव ठाकरे हे एकत्र येऊन मोर्चा काढणार आहेत. या मोर्चा संदर्भात बोलताना संजय राऊत यांनी उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे कोणत्या बंकर मध्ये लपून बसले आहेत? अशी बोचरी टीका केली होती. त्याला मंत्री गुलाबराव पाटील यांनी जोरदार प्रत्युत्तर दिले आहे. एकनाथ शिंदे हे तुझ्या छाताडावर बसलेले आहेत, सोन्या तू अजून शुद्धीवर आला नाही का? अशा शब्दात गुलाबराव पाटील यांनी संजय राऊत यांच्यावर टीका केली आहे.

राज आणि उद्धव ठाकरे पुढील काळात एकत्र येतील का? या प्रश्नावर देखील गुलाबराव पाटील यांनी प्रतिक्रिया दिली आहे. जाला-त्याला स्वतंत्र विचार करण्याची बुद्धी देवाने दिली आहे. शेवटी कोणी काय निर्णय घ्यावा? हा त्या पक्षप्रमुखांचा विषय आहे. ते दोन्ही पक्षप्रमुख आहेत. ते जो निर्णय घेतील, तो घेतील, अशी प्रतिक्रिया गुलाबराव पाटील यांनी दिली आहे.आगामी काळात होणाऱ्या स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीतील जागा वाटपावर सुरू असलेल्या वादाला देखील गुलाबराव पाटील यांनी प्रत्युत्तर दिले आहे. अजून दोन्ही पक्षांमध्ये कोणतीही बोलणी झालेली नाही. त्यामुळे जागा वाटपाबाबत कोणी काही म्हटले असेल तर तो त्याचा त्याचा विषय आहे. याबाबत योग्य निर्णय घेतला जाईल. जी पॉलिसी ठरेल ते आम्ही ठरवू, जागा वाटपामध्ये अशा गोष्टी होत राहतात, असे देखील गुलाबराव पाटील यांनी म्हटले आहे.

# सांगोला तालुक्यासाठी नवीन एम. आय.डी.सी.मंजूर करणार-उदय सामंत

## माजी आ.शहाजीबापू पाटील यांच्या मागणीस यश

**सांगोला । प्रतिनिधी**

सांगोला तालुक्याचे माजी आमदार ड. शहाजीबापू पाटील यांनी सांगोला तालुक्याच्या सर्वांगीण विकासासाठी नवीन भव्य एम. आय. डी. सी .उभारावी अशी मागणी उद्योगमंत्री नाम.उदय सामंत यांची भेट घेऊन केली . सांगोला तालुक्यातील तरुणांच्या हाताला रोजगार देण्यासाठी राज्याचे उद्योगमंत्री उदय सामंत यांनी नवीन एम. आय. डी. सी .मंजूर करण्याचे आश्वासन माजी आम. अँड. शहाजीबापू पाटील यांना दिले आहे. नवीन एम.आय.डी.सी मुळे तालुक्याचा सर्वांगीण विकास होण्यास मदत होणार आहे. आमदार ड.शहाजीबापू पाटील यांनी केलेल्या मागणीला मोठे यश आले आहे. भविष्यात उद्योग व्यवसाय वाढल्याने तालुक्यात क्रांती होईलअशी माहिती सांगोला तालुक्याचे माजी आमदार शहाजीबापू पाटील यांनी दिली आहे. उद्योगमंत्री उदय सामंत यांच्या भेटीप्रसंगी उद्योगपती अभिजीत नलवडे ,योगेश खटकाळे, विशाल खटकाळे हे मान्यवर उपस्थित होते.



माजी आम.ड. शहाजीबापू पाटील यांच्या मागणीला व पाठपुराव्याला मोठे यश आले आहे. नवीन एम .आय. डी. सी. निर्मितीमुळे भविष्यात तालुक्यात उद्योगाचे जाळे निर्माण होवून तालुक्याची अर्थव्यवस्था बळकट होईल . तरुणांना नोकरी मिळेल. त्यामुळे सांगोला तालुक्याचा व्यापारीदृष्टया विकास होईल व तालुक्याच्या विकासास चालना मिळेल. व्यापारी व औद्योगिकदृष्ट्या तालुक्याचा कायापालट होणार आहे अशी माहिती माजी आमदार शहाजीबापू पाटील यांनी दिली आहे.

# नगरपरिषद कार्यालयासमोर सय्यद सलीमबापुंच्या नेतृत्वाखाली रस्ता रोको

## आंदोलकांनी विविध मागण्या लावून धरत मुख्याधिकाऱ्यांना आणले ताळ्यावर

**माजलगाव । प्रतिनिधी**

शहरातील नागरी समस्या संदर्भात असणाऱ्या प्रश्नांसह विविध मागण्या लावून धरत आंबेडकरी विचार मोर्चाच्या वतीने सय्यद सलीमबापू यांनी सोमवार दि.३० रोजी सकाळी नगरपरिषद कार्यालय समोर रास्ता रोको केला. यावेळी आंबेडकरी विचार मोर्चाच्या कार्यकर्त्यांनी नगर परिषदेच्या कामकाजाविषयी निषेधाच्या घोषणा करत मुख्याधिकाऱ्यांना ताळ्यावर आणले. माजलगाव नगर परिषदेमध्ये कार्यरत असलेले प्रशासक तथा मुख्याधिकारी चंद्रकांत चव्हाण यांचा मनमानी कारभार सुरू आहे. जनतेची अनेक कामे खोळंबली आहेत.परंतु पालिका प्रशासन गेंड्याची कातडी पांघरून आहे.या धोरणाविरुद्ध समाजसेवक व आंबेडकरी विचार मोर्चाचे मराठवाडा अध्यक्ष सय्यद सलीमबापू यांनी एल्गार पुकारला. संघटनेच्या वतीने वतीने सोमवार दि.३० जुन २०२५ रोजी नगर परिषदेसमोर रास्ता रोको केला. यावेळी कार्यकर्त्यांनी नगर परिषदेच्या ढिसाळ कामाचा निषेध व्यक्त करत घोषणाबाजी केली. शहरातील नगरपरिषद हद्दीमध्ये किरायदार,भोगवटदार,बेघर या गोरगरीब लोकांना घरकुल देण्यात यावे.आलेले नाही. याला मंजुरी देण्यात यावी.आझाद नगर येथे अर्धवट रस्ता तयार करण्यात आलेला आहे,तो पूर्ण करण्यात यावा.सन २०२० ते २०२५ या वर्षात नगरपरिषद माजलगाव यांनी किती गुंठेवारी केल्या याची यादी देण्यात यावी.किती लोकांना ओपनस्पेच्या बोगस पिटीआर देण्यात आल्या याची माहिती देण्यात यावी.शहरात किती ओपनस्पेस,डीपीरोड आहेत याची माहिती देण्यात यावी.इत्यादी मागण्या यावेळी कार्यकर्त्यांनी लावून धरल्या.सय्यद सलीमबापू यांच्या नेतृत्वाखाली आंबेडकरी विचारू मोर्चाच्या वतीने केलेल्या भव्य रास्ता रोकोने धास्तावलेले पालिका प्रशासन ताळ्यावर आले. दरम्यान प्रशासनाच्या वतीने मागण्यांसंदर्भात ठोस निर्णय घेण्याचे अभिवचन आंदोलकांना दिले.या आंदोलनात आंबेडकरी विचार मोर्चाचे मराठवाडा अध्यक्ष सय्यद सलीमबापू,एडवोकेट सय्यद अल्ताफ,यांच्यासह संघटनेचे शेकडो पदाधिकारी सहभागी होते.




# अमरावतीत पालकमंत्र्यांच्या हस्ते १२ लाभार्थ्यांना जमीन पट्टे वितरण

**अमरावती (वृत्तसंस्था)**-सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागाच्या कर्मवीर दादासाहेब गायकवाड सबळीकरण व स्वाभिमान योजनेअंतर्गत जिल्ह्यातील डझनभर भूमिहीन लाभार्थ्यांना पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांच्या हस्ते शेतजमिनीच्या पट्ट्यांचे वितरण करण्यात आले.शासकीय विश्रामगृह येथे पालकमंत्री बावनकुळे यांनी स्वतः शेतजमीन पट्टे व आदेशाचे वितरण केले. आमदार प्रताप अडसड, आमदार राजेश वानखडे, माजी पालकमंत्री प्रवीण पोटे-पाटील, अतिरिक्त जिल्हाधिकारी गोविंद दाणेज, निवासी उपजिल्हाधिकारी अनिल भटकर, तहसीलदार विजय लोखंडे यावेळी उपस्थित होते.

मोर्शी तालुक्यातील मौजा शिरलस येथील श्रीमती शिला वानखडे, अशोक वानखडे, बाळु खडसे तसेच मौजा नेरपिंगळाई भाग दोन येथील अमोल डाखोडे यांची कर्मवीर दादासाहेब गायकवाड सबळीकरण व स्वाभिमान योजनेसाठी निवड करण्यात आली होती. याशिवाय नांदगाव खंडेश्वर तालुक्यातील मौजा माहुली चोर येथील माला इंगोले, रेखा कांबळे, मौजा येवती येथील जितेंद्र घोडेस्वार, शिवानंद मेश्राम, संजय चिमणकर, रमेश मुनेश्वर, मंगेश लोखंडे आणि अमर बनसोड यांचीही कर्मवीर दादासाहेब गायकवाड सबळीकरण व स्वाभिमान योजनेसाठी निवड करण्यात आली.

सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागामार्फत अनुसूचित जाती व वंचित दुर्बल घटकांतील व्यक्तींच्या सर्वांगीण विकासासाठी विविध लोककल्याणकारी योजना राबविल्या जातात. यापैकी कर्मवीर दादासाहेब गायकवाड सबळीकरण व स्वाभिमान योजना ही महत्त्वपूर्ण योजना आहे.

या योजनेचा मुख्य उद्देश १८ चे ६० वयोगटातील अनुसूचित जाती व नवबौद्ध घटकांतील दारिद्र्यरेषेखालील पिढ्यानपिढ्या भूमिहीन असलेल्या शेतमजूर कुटुंबांना उत्पन्नाचे साधन उपलब्ध करून देणे, त्यांचे राहणीमान उंचावणे आणि मजुरीवरील त्यांचे अवलंबित्व कमी करून त्यांना कायमस्वरूपी उत्पन्नाचे साधन मिळवून देणे हा आहे. या योजनेअंतर्गत अशा भूमिहीन शेतमजूरांना त्यांची शेतमालक होण्याची इच्छा पूर्ण करण्यासाठी १०० टक्के अनुदानावर ४ एकर कोरडवाहू किंवा २ एकर बागायती शेतजमीन कसण्याकरिता उपलब्ध करून दिल्या जाते.महाराष्ट्र शासनाच्यावतीने सन २०२५-२६ या वर्षात पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर गौरवशाली अभियान राज्यभर राबविण्यात येत आहे. याच अभियानाअंतर्गत समाजातील वंचित, दुर्बल घटकांना प्रत्यक्ष लाभ देण्यासाठी, कर्मवीर दादासाहेब गायकवाड सबळीकरण व स्वाभिमान योजनेअंतर्गत जिल्ह्यातील अनुसूचित जाती व नवबौद्ध घटकांतील दारिद्र्यरेषेखालील भूमिहीन शेतमजूर असलेल्या लाभार्थ्यांना शेतजमीन पट्टे व आदेशाचे वितरण करण्यात आले. शेतजमीन प्राप्त झालेल्या नागरिकांनी या योजनेबद्दल शासनाप्रती कृतज्ञता व्यक्त केली आहे.

# महामार्गावरील अतिक्रमणे काढा;अपघात स्थळी रूग्णवाहिका तातडीने पाठवा

## जिल्हा रस्ता सुरक्षा समितीच्या बैठकीत खा.बजरंग सोनवणे यांच्या अधिकार्‍यांना सुचना

**बीड । प्रतिनिधी**

जिल्ह्यात विविध रस्त्यावर ब्लॅकस्पॉट आहेत. शिवाय राष्ट्रीय महामार्गावर अतिक्रमणे वाढत आहेत. यामुळे अपघात होत असून अपघात टाळण्यासाठी अतिक्रमणे काढा आणि अपघातस्थळी तातडीने रूग्णवाहिका पाठवा, अशा सुचना खा.बजरंग सोनवणे यांनी संबधित अधिकार्‍यांना दिल्या.जिल्हाधिकारी कार्यालयात सकाळी १२.३० वाजता जिल्हा रस्ता सुरक्षा समितीची बैठक आयोजीत केली होती. यावेळी खा.बजरंग सोनवणे बोलत होते. यावेळी जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन, मुख्य कार्यकारी अधिकारी जितीन रेहमान आणि विविध विभागाचे विभाग प्रमुख उपस्थित होते. यावेळी बोलताना खा.बजरंग सोनवणे म्हणाले, अपघाताचे प्रमाण हे सायंकाळी व पहाटे जास्त असते. या दरम्यान आपल्या यंत्रणेने सतर्क राहायला हवे. जिल्ह्यात अनेक असे अतिक्रमण आहेत, ज्यामुळे अपघाताचे प्रमाण वाढलेले आहे. ते अतिक्रमण काढण्याचा सूचना केल्या. विशेषत: गेवराई तालुक्यातील गढी भागात अनेक वेळा अपघात झालेले आहेत. त्या ठिकाणी तांत्रिक सुधारणा करण्याच्या सूचना केल्या. जिल्ह्यात कोठेही अपघात झाला तर त्या ठिकाणी रुग्णहिका तात्काळ मिळावी, यासाठी



जिल्हा शल्यचिकित्सक यांना सूचना केल्या. माजलगाव तालुक्यातील सादोळा येथील पुलाचे काम तातडीने सुरू करावे असे म्हणत, लोकांची अडवणूक होणार नाही, याची काळजी घ्या, असा सल्लाही यावेळी त्यांनी दिला. दरम्यान, तेलगाव या ठिकाणी रस्त्याचे पाणी व्यवस्थित न काढल्यामुळे त्या ठिकाणी राहणार्‍या लोकांना नाहक त्रासाला सामोरे जावे लागत आहेत. ते दुरुस्ती करण्यात यावे. राष्ट्रीय महामार्ग खात्याचे स्वतंत्र ऑफिस बीड जिल्ह्यात होण्यासाठी आर.ओ ऑफिसला प्रस्ताव पाठवा, अशा सुचना देखील दिल्या. राष्ट्रीय महामार्ग संस्थेचे स्वतंत्र कार्यालय बीडला झाल्यास जिल्ह्यातील कामे वेळेत मार्गी लागतील, अशी अपेक्षाही यावेळी त्यांनी व्यक्त केली. खरवंडी-मादळमोही-पाडळसिंगी -गढी- माजलगाव या महामार्गावरील तालखेड फाटा, शृंगारवाडी फाटा व इतर सर्व ठिकाणी रस्ते कामाचा दर्जा अत्यंत खराब असल्यामुळे अपघात होत असले बाबत तक्रारी होत आहेत. भविष्यात अपघात होऊ नयेत यासाठी आवश्यक त्या सुधारणा करण्यात याव्यात, असेही म्हटले.

**'टॉप फाईव्ह' विषयांना घातला हात**

१. बीड जिल्ह्यातील राष्ट्रीय महामार्ग क्र.४५८ डी व ४५८ सी या रस्त्यावरील प्रमुख शहराभोवती नवीन बायपास/ओव्हर ब्रिजेस (अंबाजोगाई -केज-नेकनुर-मांजरसुंबा-पाटोदा व माजलगाव शहर) करणे. या रस्त्यावरील अपघात होत असलेल्या भागातील दुरुस्तीची कामे तातडीने करणे.

२. पिंपळा धायगुडा-लोखंडी सावरगाव -केज-मांजरसुंबा-पाटोदा-चुंबळी फाटा हा रस्ता दुहेरी वाहतुकीचा करणे. अंबाजोगाई शहरात यशवंतराव चव्हाण चौकामधे इलेव्हेटेड पादचारी मार्ग तयार करणे.

३. राष्ट्रीय महामार्ग सुरत-चेन्नई साठी संपादन करणे आवश्यक असणार्‍या जमिनीच्या भूसंपादनाची सद्यस्थिती बाबत सविस्तर चर्चा केली.

४. रामा ५४८ माजलगाव- धारूर -केज या रस्ता कामाचा दर्जा अत्यंत खराब असल्यामुळे तेथे दररोज अपघात होत आहेत. संबंधित एजन्सी कडून तातडीने आवश्यक त्या सुधारणा करुन घेण्यात याव्यात. बर्दापूर-लोखंडी सावरगाव दुहेरी रस्ता करणे बाबत निविदा प्रक्रियेला वेग द्यावा.

५. ऋपाटोदा व आष्टी तालुक्यातील पिठ्ठी-अंमळनेर-टाकळी काजी हा रस्ता तसेच गेवराई तालुक्यातील राक्षसभुवन फाटा -उमापूर- शेवगाव हे दोन्ही रस्ते राष्ट्रीय महामार्गाचा दर्जा देण्यात यावा.

### पालखी मार्गाचे काम निकषाप्रमाणे पुन्हा करावे

**पैठण-पंढरपूर राष्ट्रीय महामार्ग मधील डोंगरकिन्ही ते पारगाव घु.(अनपटवाडी) रस्त्याचा दर्जा अत्यंत खराब आहे. तसेच मळेकरवाडी घाटातील डांबरीकरणाचे काम वारंवार सूचना देऊ नही अद्याप सुरु झालेले नाही. या रस्त्याच्या संपूर्ण कामात जागोजागी मोठ-मोठ्या भेगा पडलेल्या आहेत त्यामुळे रोज दुचाकी/चारचाकी वाहनांचे अपघात होत आहेत. पाटोदा शहरातील रस्ता काम अपूर्ण आहे. संपूर्ण रस्त्याचे काम अंदाजपत्रकातील निकषा प्रमाणे प्रमाणे पुन्हा करून घेण्यात यावे. एजन्सीवर आवश्यक ती कार्यवाही प्रस्तावित करावी. अतिरिक्त बाब या नावाने करण्यात आलेल्या अनावश्यक खर्चाची वरिष्ठ पातळीवरून चौकशी करण्यात यावी व जबाबदारी निश्चित करण्यात यावी, असे खा.सोनवणे यांनी म्हटले.**

## कांताबाई भीमाशंकर स्वामी (मठपती) यांचे दुःखद निधन

**परळी वैजनाथ । प्रतिनिधी**

जंगम गल्ली, परळी वैजनाथ येथील रहिवासी व समाजसेविका श्रीमती



कांताबाई भीमाशंकर स्वामी (मठपती) यांचे रविवार, दिनांक २९ जून २०२५ रोजी रात्री ९.३० वाजता दुःखद निधन झाले. निधन समयी त्या ७१ वर्षांच्या होत्या. कांताबाई स्वामी (मठपती) या अत्यंत मनमिळावू, सुस्वभावी आणि सामाजिक कार्यात सक्रिय व्यक्तिमत्त्व म्हणून परळीत सर्वपरिचित होत्या. वीरशैव लिंगायत समाजाच्या धार्मिक व सामाजिक कार्यात त्यांचा सक्रीय सहभाग होता.त्यांच्या पश्चात एक मुलगा धनंजय स्वामी (मठपती), नातु गणेश , अनुराग , आदित्य , एक मुलगी, सुना, नातवंडे असा परिवार आहे. त्यांच्या निधनाने परिसरात शोककळा पसरली आहे.आज सोमवार, दिनांक ३० जून रोजी त्यांचावर वीरशैव लिंगायत स्मशानभूमी, परळी येथे अंत्यसंस्कार करण्यात आले. त्यांच्या अंत्यविधीस समाजातील अनेक मान्यवर, नातेवाईक, आणि हितचिंतक उपस्थित होते.

### बीड जिल्हा अन्याय,अत्याचारग्रस्त म्हणून घोषीत करा-अनिल तुरुकमारे

## गोपीनाथराव मुंडे मागासवर्गीय सुतगीरणी केज दोषी विरुध्द गुन्हा दाखल करण्याचे आदेश देण्यास टाळाटाळ;आझाद मैदान मुंबई येथे उपोषण धरणे

**बीड । प्रतिनिधी**

बीड जिल्ह्यात नवनीत कावत हे पोलीस अधिक्षक म्हणुन पदभार घेतल्या पासुन आज पर्यंत बीड जिल्ह्यात गुन्हेगारीचे प्रमाण वाढले असुन महिला वरील अन्याय अत्याचारात वाढ झालेली आहे. पोलीस अधिक्षक हे पोलीस अधिक्षक कार्यालयात बसुन फक्त आदेश देण्याचे काम करीत आहेत, अनुचीत प्रकार घडल्यास ते तात्काळ भेट देत नाहीत त्यामुळे गुन्हेगारी प्रवृत्ती वाढत चालली आहे. अनुसुचित जाती जमाती मधील महिला यांच्यावर मारहाणीचे प्रकार, विनयभंगाचे प्रकार, जातीवाचक शिवीगाळीचे प्रकार घडले आहेत गुन्हा दाखल होऊन ही या प्रकरणी त्यांनी तात्काळ कार्यवाही न करता दुर्लक्ष केल्यामुळे महिलांच्या अन्याय अत्याचारात वाढ होत आहे. अकार्यक्षम पोलीस अधिक्षक नवनीत कावत यांची बदली मुंबई येथील पोलीस मुख्यालयाच्या नियंत्रण कक्षात करण्यात यावी.



तसेच लोकनेते गोपीनाथराव मुंडे मागासवर्गीय सुतगीरणी केज यांचे मुख्य प्रवर्तक माजी आमदार संगीता ठोंबरे, चेअरमन विजयप्रकाश ठोंबरे, तत्कालीन जात पडताळणी सदस्य सचिव रविकांन्त मारुती शिंदे बीड, राजकुमार दयाराम व्हावळे या सर्वांनी संगनमत करुन महाविद्यालयात शिकणारे विद्यार्थी, विद्यार्थीनी तसेच काही नौकरीदार यांचे जात वैद्यता प्रमाणपत्र जात पडताळणी विभागाकडुन चुकीच्या पध्दतीने हस्तगत करुन लोकनेते गोपीनाथराव मुंडे मागासवर्गीय सुतगीरणीचे परस्पर सभासद दाखवले आहेत. त्यात माझा मुलगा ऋषीकेश अनिल तुरुकमारे याचा ही समावेश आहे. या बाबत मा. मुख्यमंत्री, गृहमंत्री, गृहसचिव, पोलीस महासंचालक, विशेष पोलीस महासंचालक संभाजीनगर इत्यादी ठिकाणावरुन चौकशी करण्याचे आदेश पोलीस अधिक्षक यांना देण्यात आले होते. मा. पोलीस अधिक्षक बीड यांनी अप्पर पोलीस अधिक्षक तिडके मॅडम, अंबाजोगाई यांच्या अधिपत्याखाली विशेष चौकशी समिती नेमण्यात आली. सदर चौकशी समीतीने चौकशी करुन अडीच महिन्यापुर्वी पोलीस अधिक्षक बीड यांना अहवाल सादर केला आहे. परंतु पोलीस अधिक्षक बीड हे चौकशी अहवालाप्रमाणे कार्यवाही करण्याचे आदेश देण्या ऐवजी किरकोळ मुद्दे काढुन फेरचौकशी चे आदेश काढले आहेत. चौकशी समिती अहवालाप्रमाणे कार्यवाही करणे वजी संबंधीत सुतगीरणीच्या दोषींना वाचविण्यासाठी फेर चौकशीचे आदेश काढले आहेत असे स्पष्ट दिसते. चौकशी समिती अहवाला प्रमाणे कार्यवाही करण्यात यावी यासाठी मा. पोलीस अधिक्षक यांना अनेकवेळा भेट देवुन विनंती केली परंतु संबंधीता विरुध्द गुन्हा दाखल करण्याचे आदेश देण्याचे टाळाटाळ करत आहेत तसेच सुतगीरणीचे मुख्यप्रवर्तक, चेअरमन व दोषी अधिकारी यांना पाठीशी घालण्याचे काम पोलीस अधिक्षक बीड हे करीत आहेत, तरी सदरील सुतगीरणी प्रशासना विरुध्द तात्काळ अप्पर पोलीस अधिक्षक अंबाजोगाई यांच्या चौकशी अहवाला प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात यावा व बीड जिल्हा अन्याय आणि अत्याचारग्रस्त घोषीत करण्यात यावा या मागणीसाठी आज १ जुलै २०२५ पासुन आझाद मैदान मुंबई या ठिकाणी धरणे उपोषण सुरु केले आहे.

### भाटवडगावात शाळकरी मुलींना सायकल वाटप

## माजी सरपंच गीताराम अनभुले यांच्या वाढदिवसानिमित्त उपक्रम

**माजलगांव । प्रतिनिधी**

समाजासाठी काहीतरी चांगलं करून वाढदिवस साजरा करण्याचा आदर्श भाटवडगावात पाहायला मिळाला. येथील माजी सरपंच गीतारामजी आबा अनभुले यांनी आपल्या ४३ व्या वाढदिवसानिमित्त एक आगळावेगळा उपक्रम राबवून गावकऱ्यांचे मन जिंकले.

गावातील शाळकरी मुलींना सायकल वाटप करून त्यांचा शिक्षणप्रवास अधिक सुलभ आणि सुरक्षित व्हावा, यासाठी या उपक्रमाचं आयोजन करण्यात आलं. गावापासून शाळेचं अंतर सुमारे १ किलोमीटर असून, मुलींना दररोज शाळेत जाण्यासाठी पायी चालावं लागतं. ही अडचण लक्षात घेऊन, सामाजिक जाणिवेतून प्रेरित होऊन हा



उपक्रम हाती घेण्यात आला. या सायकल वाटप कार्यक्रमात गावातील वडीलधारी मंडळी, महिलावर्ग, शिक्षक आणि तरुण मित्रपरिवार उपस्थित होता. या कार्यक्रमाचं आयोजन विद्यमान सरपंच किशोर फुलसरे यांनी केलं होतं.

## आदर्श शिक्षक राजेंद्र सोनवणे यांचा सेवानिवृत्ती सोहळा उत्साहात संपन्न

**केज । प्रतिनिधी**

आदर्श शिक्षक राजेंद्र सोनवणे सर यांचा केज तालुक्यातील तांबवा येथे सेवानिवृत्ती सोहळा अत्यंत उत्साहात आणि स्नेहभावनेत साजरा करण्यात आला. दीर्घकाळ सार्वजनिक सेवेत कार्यरत असलेल्या राजेंद्र सोनवणे सर यांनी आपल्या कार्यकाळात तब्बल ३६वर्षाचा प्रदीर्घ असा शैक्षणिक क्षेत्रातील अभिमानास्पद अन् गौरवास्पद प्रवास प्रामाणिकपणा, सचोटी आणि लोकाभिमुख दृष्टिकोन यामुळे सहकाऱ्यांमध्ये व समाजात विशेष स्थान निर्माण केले होते.




कार्यक्रमाची सुरुवात महापुरुषांच्या प्रतिमेचे पूजन करून करण्यात आली. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी मा. श्री. संतोष अर्जुनराव कांदे (अध्यक्ष, शा.व्य.समिती, तांबवा) होते,प्रमुख पाहुणे म्हणून लक्ष्मण बेडस्कर साहेब (गटशिक्षणाधिकारी), सौ. दिपालीताई अरुण चाटे (सरपंच ,ग्रा.पं. तांबवा) मिराताई अनिल चाटे(उपसरपंच ग्रा.पं. तांबवा)तसेच मुख्याध्यापक नेहरकर सर,मुख्याध्यापक अश्रुबा सोनवणे सर,चाटे मच्छिंद्र सर,शिंदे मॅडम,गुजर मॅडम,औताडे मॅडम, खरबडे मॅडम ,बालासाहेब चाटे सर,चाटे सर,गळगटे सर,अनेक सहकारी, मित्र, कुटुंबीय व विविध क्षेत्रातील मान्यवर उपस्थित होते. सातवीच्या विद्यार्थीनी पंकजा चाटे,भरती चाटे यांनी देखील भाषण केले उपस्थित मान्यवरांनी आपल्या भाषणातून राजेंद्र सोनवणे सर यांच्या कार्यपद्धतीचे, शिस्तप्रियतेचे आणि सामाजिक बांधिलकीचे मनापासून कौतुक केले.सोनवणे सर यांनी आपल्या उत्तरार्धातील भाषणात सर्व सहकाऱ्यांचे, वरिष्ठांचे व कुटुंबियांचे आभार मानले. त्यांनी सेवानिवृत्तीनंतरही सामाजिक कार्यात सक्रिय राहण्याची इच्छा व्यक्त केली.कार्यक्रमाचे सूत्रसंचालन हजारे सर ,प्रास्ताविक केंद्रे सर आभार प्रदर्शन चाटे दत्तात्रय यांनी केले. स्वमनोगत राजेंद्र सोनवणे सर यांनी केले.संपूर्ण सोहळा आनंदमय वातावरणात पार पडला.



**केज नगरपंचायतचे माजी नगरसेवक कपिल मस्के यांनी केला आदर्श शिक्षक राजेंद्र सोनवणे यांचा गुणगौरव सत्कार प्रसंगी सामाजिक कार्यकर्ते सुदेश दादा शिरसट ,दैनिक वादळ वार्ताचे संपादक अजय भांगे,सामाजिक कार्यकर्ते शिखर शिरसाठ यावेळी उपस्थित होते.**

## बॅचलर ऑफ लायब्ररी अँन्ड इन्फर्मेशन सायांस परिक्षेत आनंद वसुदेव गायकवाड हे प्रथम श्रेणीत उत्तीर्ण

**केज । प्रतिनिधी**

यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नाशिक अंतर्गत स्वामी रामानंद तीर्थ महाविद्यालय, आंबाजोगाई येथून मे जुन २०२५ घेण्यात आलेल्या बॅचलर ऑफ लायब्ररी अँन्ड इन्फर्मेशन सायांस( ग्रंथालय व माहिती शास्त्र) पदवी परिक्षेत आनंद वसुदेव गायकवाड हे ६८. ३०% गुण घेवून प्रथम श्रेणीत उत्तीर्ण झाले. आनंद वसुदेव गायकवाड हे स्वानंद सार्वजनिक वाचनालय आनंदगांव ता. केज जि. बीड मध्ये कार्यरत आहेत. आनंद वसुदेव गायकवाड यांनी गंथालय व माहिती शास्त्र बॅचलर ऑफ लायब्ररी अँन्ड इन्फर्मेशन सायांस मध्ये ६८. ३०% गुण घेवून उत्तीर्ण झाल्याबद्दल आंबाजोगाई सेंटरचे संचालक डॉ. पी. सी. गादेकर, डॉ. मधुबाला, प्रा.डॉ. आशा गायकवाड, प्रा. डॉ. मुंडे, प्राध्यापक वृंद तसेच स्वानंद सार्वजनिक वाचनालय, आनंदगांव ता. केज. जि. बीड चे संस्थापक अध्यक्ष, प्रचार्य, डॉ. वसुदेव( बप्पा) गायकवाड, उपाध्यक्ष मुरलीधर शिंदे, सचिव सौ. छायाताई सोमवंशी, सहसचिव ज्ञानोबा भोगजकर, सदस्या सौ. सुमनताई गायकवाड,तसेच मित्रपरिवाराकडून आनंद( भैय्या) गायकवाड यांचे अभिनंदन होत आहे.



हे पत्रक मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक अजय महादेव भांगे यांनी निर्मिती प्रिंटिंग प्रेस, टाकळी रोड , धोंडीपुरा , जोशी नर्सिंग होमच्या समोर बीड ता.जि. बीड ४३११२२ येथे छापून दैनिक वादळवार्ता कार्यालय, महात्मा फुले नगर केज, पाण्याच्या टाकीजवळ केज ता. केज जि. बीड ४३११२३ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले.मो.न.९४२२६६००७७

This newspaper is printed by owner, printer,publisher,editor Ajay Mahadev Bhange at nirmiti printing press, takli road, dhondipura in front Joshi nursing Home,Beed,tq.Beed,Dist.Beed 431122, Maharashtra and published at Dainik Vadalvarta office Mahatma Phule Nagar, near water tank kaij tq.kaij dist.Beed 431123(Maharashtra) mo.no.9422660077